**प्रेस नोट** **स्थानिक गुन्हे शाखा,यवतमाळ**
**दिनांक २७/०४/२०१८**

## आय.पी.एल.सटयावर धाड,एक लाख बहात्तर हजाराचा माल जप्त

**टोळी विरोधी पथकाची कार्यवही**

यवतमाळ शहरामध्ये आयपीएल मधील क्रिकेट मॅचवर मोठया प्रमाणात सटटा लागत असल्याने स्थानिक गुन्हे शाखे कडुन त्यावर आळा घालण्या साठी मोहीम सुरु असतांना दि.२६/०४/२०१८ रोजी टोळी विरोधी पथक,स्थागुशा,यवतमाळ यांना खात्रीशीर गोपनीय माहिती मीळाली कि, आयपीएल ११ सिझनचे क्रिकेट सामन्यातील सन रायझर हैदराबाद विरूध्द पंजाब टिम च्या क्रिकेट मॅचवर मोबाइल फोन द्वारे सटटा घेवुन पैशाची बाजी लावून हारजितचा जुगार राजेश विश्वंबर चमेडिया रा.सुरज नगर,यवतमाळ हा त्याचे राहते घरी जुगाराचा अडडा भरवुन सटटा खेळवत असल्याची खात्रीशिर गोपनिय माहीती मिळाल्यावरून टोळी विरोधी पथकाने सापळा रचुन सुरज नगर मधील राजेश चमेडीया याचे सटयाचे अडयावर धाड टाकुन राजेश चमेडीया याला अटक केली व सटटा लावण्या करीता उपयोगात येणारे साहीत्य १)दोन इनफोकस कंपनीचे मोबाइल किं.४,०००/- रु.२) एक डेल कंपनीचा लॅपटॉप किं.३५,०००/-रु.३) एक फिलीप्स कंपनीचा ३२ इंची टीव्ही किं.४०,०००/-रु.४) एक डेन कंपनीचा सेटटॉप बॉक्स किं.२०००/- रु.५)एक कॅलक्यूलेटर किं.२००/-रु.व नगदी ९०,०००/रू,असा एकूण **१,७१,२००/रू** चा मुददेमाल यवतमाळ जिल्हयामध्ये पहील्यांदाच जप्त करण्यात आला.

सदरची कारवाई मा.पोलीस अधिक्षक श्री एम. राज कुमार, मा.अप्पर पोलीस अधिक्षक श्री.अमरसींह जाधव,पोलीस निरीक्षक श्री मुकुंद कुलकर्णी स्थागुशा, यवतमाळ यांचे मार्गदर्शनाखाली टोळी विरोधी पथकाचे पोउपनि संतोष मनवर, सफौ/ऋषी ठाकुर, पोहेकॉ/संजय दुबे,गणेश देवतळे,योगेश गटलेवार पोना/अमोल चौधरी,किरण श्रीरामे,आशिष गुल्हाणे,विनोद राठोड,राज कांबळे,मपोशी/विभावरी ढवस,प्रियंका ढोके यांनी केली.